Prof. Dilip U. Pal's
LAKSHYA
Private Tuition
Creating Joyful Education



# बोर्ड कृतिपत्रिका : फेब्रुवारी 2025

## मराठी अक्षरभारती

**वेळ : 3 तास** | **एकूण गुण : 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना : -**

(1) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग 5 – उपयोजित लेखन **प्र.5** (अ) **(2)** सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील **प्र.1** (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.


Prof. Dilip U. Pal's

### विभाग 1 : गद्य

LAKSHYA

**1.** (अ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) आकृती पूर्ण करा :** **[2]**




Private Tuition
Creating Joyful Education

माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्याएवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात बिटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे; कैऱ्या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतून बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्याबद्दल बऱ्याच तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा.

**(2) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा :** **[2]**

(i) दिवसभराच्या खेळाने लेखकाला भूक तर खूपच लागलेली असायची-

(ii) लेखकाचा जन्म मुंबईत गरीब कुटुंबात झाला-

(iii) लेखकाचे वडील बँकेमध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते-

(iv) लेखक लहानपणी खोडकर होते-

**(3) स्वमत :** **[3]**

(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) आकृती पूर्ण करा : [2]

दाजीसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये → ☐ ☐ ☐ ☐

> सुरुवातीचे अध्यक्षांचे स्वागत वगैरे औपचारिक झाल्यावर दाजीसाहेबांनी बोलायला सुरुवात केली. अब्दुल बघतच राहिला, चौऱ्याऐंशी वर्षांच्या वृद्धाचा ताठपणा, उंच सडसडीत देहयष्टी, तेज:पुंज चेहरा, गौरवर्ण, पांढरेस्वच्छ धोतर व त्यावर बंद गळ्याचा कोट आणि डोक्याला केशरी फेटा. या वयातही आवाजातला खणखणीतपणा आणि बोलण्यातली ऐट यामुळे अब्दुल भारावून बघत राहिला. दाजीसाहेब बोलत होते-
>
> "रामानं सेतुबंधन केलं; पण त्यासाठी अनेकांचा हातभार लागला. अगदी लहानशी खार; तिनंसुद्धा आपल्या शक्तीप्रमाणे सेतुबंधनाला मदत केली. तशीच मदत या तपोवनासाठी देणाऱ्या काही व्यक्ती आम्हांला सुदैवाने लाभल्या आहेत. संक्रांतीला आणि जेष्ठ पौर्णिमेला बांगड्या भरण्याचा प्रस्ताव जेव्हा समोर आला होता तेव्हा अनेक बांगडीवाल्यांना भेटून इथं येण्याबद्दल विनंती केली; पण कुणीही माझ्या विनंतीचा स्वीकार केला नाही. अब्दुलमियाँनी मात्र स्वत:हून इथं येण्याचं आश्वासन दिलं आणि दरवर्षी न चुकता अब्दुलमियाँ इथं येतात. येथील भगिनींच्या जीवनात आनंदाचा वर्षाव करतात. वर्षातले दोन दिवस तपोवनात अतिशय आनंदाचे आणि उत्साहाचे असतात. कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता अब्दुलमियाँ न बोलावता दरवर्षी येतात. तपोवनातील स्त्रिया, मुलीबाळी त्यांच्या येण्याकडे डोळे लावून बसलेल्या असतात."

(2) चौकटी पूर्ण करा : [2]

(i) उताऱ्यात आलेले सणाचे नाव – ☐

(ii) रामाला सेतुबंधनासाठी मदत करणारी – ☐

(3) स्वमत : [3]

'तपोवनात जाऊन अब्दुलने केलेली समाजसेवा', याविषयी तुमचे विचार लिहा.

## अपठित गद्य

(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) आकृतिबंध पूर्ण करा : [2]

निसर्गाने भागवलेल्या मानवी गरजा → ☐ | वस्त्र | ☐

> निसर्ग हा माणसाचा पहिला गुरू. निसर्गातील प्रत्येक घटकापासून माणूस खूप काही शिकला आहे, शिकत आहे व पुढेही शिकू शकतो. तसं पाहिलं तर निसर्ग गुरूपेक्षा माणसाचा मित्र मानला पाहिजे असे एक मतही अगदी आग्रहाने मांडले जाते. माणसाच्या अगदी प्रारंभीच्या काळात खरी साथ दिली ती निसर्गाने. अन्न, वस्त्र व निवारा या तिन्ही गरजा निसर्गाने भागविल्या. त्याचबरोबर प्रगतीसाठी आवश्यक ती साथही दिली. शेती, शिकार तसेच उपजीविकेसाठी, गरजा भागवण्यासाठी आवश्यक ते सर्व साहाय्य निसर्गाद्वारेच मिळत गेले.
>
> निसर्ग माणसाला भरभरून देत राहिला, त्याचबरोबर माणूसही त्या काळात निसर्गाचा ऋणीच राहिला. पण कालांतराने माणसाच्या आशा वाढत गेल्या, माणूस सुखाच्या मागे धावत राहिला, त्याचबरोबर निसर्गाच्या प्रती

Prof. Dilip U. Pal's LAKSHYA Private Tuition Creating Joyful Education

(2) **कारणे लिहा :** [2]

माणसाची निसर्गाच्या प्रती ऋणी असण्याची भावना कालांतराने कमी होत गेली, कारण

(i) ......................................................

(ii) ......................................................

## विभाग 2 : पद्य

2. (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) **चौकटी पूर्ण करा :** [2]

(i) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट – [ ]

(ii) कवीचा जवळचा मित्र – [ ]

दोन दिवस वाट पाहण्यात गेले ; दोन दु :खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला ; तारे फुलले, रात्र धुंद झाली ;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व ; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत ; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु :ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले ; दोन दिवस दु :खात गेले.

(2) **खालील आशयाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा :** [2]

(i) 'रोजची भूक भागवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आयुष्याचे दिवस वाया गेले.'

(ii) कवीचा प्रयत्नवाद आणि आशावाद.

(3) **प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा :** [2]

(i) डोईवर –
(ii) दारिद्र्य –
(iii) हरघडी –
(iv) पोलाद –

(4) **काव्यसौंदर्य :**

(आ) खालील दोन कवितांपैकी एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :

| मुद्दे | योगी सर्वकाळ सुखदाता ← किंवा → औक्षण | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री – | | | [1] |
| (2) कवितेचा विषय – | | | [1] |
| (3) पुढील ओळींचा सरळ अर्थ लिहा. | जळ वरिवरी क्षाळी मळ।<br>योगिया सबाह्य करी निर्मळ।' | नाही मुठीमधे द्रव्य<br>नाही शिरेमध्ये रक्त,<br>काय करावें कळेना<br>नाही कष्टाचे सामर्थ्य. | [2]<br>[2] |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – | | | |
| (5) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. | (i) जीवन –<br>(ii) मेघ –<br>(iii) निर्मळ –<br>(iv) रसना – | (i) औक्षण –<br>(ii) द्रव्य –<br>(iii) कल्लोळ –<br>(iv) शौर्य – | [2] |

Prof. Dilip U. Pal's
LAKSHYA
Private Tuition
Creating Joyful Education

## विभाग 3 : स्थूलवाचन

3. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : [6]

(1) टीप लिहा - वार्क

(2) 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' या विधानाची यथार्थता लिहा.

(3) 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

## विभाग 4 : भाषाभ्यास

4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

**(1) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा :** [2]

(i) सुश्रुत, ओळखलंस मला?

(ii) सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते.

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा :** [2]

(i) प्रवासात भरभरून बोलावे. (आज्ञार्थी करा.)

(ii) केवढी मोठी वसाहत आहे ही! (विधानार्थी करा.)

**(3) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (कोणतेही दोन) :** [4]

(i) अंगाचा तिळपापड होणे –

(ii) आर्जव करणे –

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :

(1) शब्दसंपत्ती :

(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : [1]

(I) रस्ता – (II) शाळा –

(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : [1]

(I) इकडे x (II) निंदा x

(iii) वचन बदला : [1]

(I) शहर – (II) गाडी –

(iv) लिंग बदला : [1]

(I) लेखक – (II) घोडा –

(2) लेखननियमांनुसार लेखन :

खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा : [2]

(i) रेखामावशिंची पावलं अधिक सूंदर आहेत.

(ii) लींबाचा रस तर मला अमृतासारखा वाटु लागला.

(3) विरामचिन्हे :

चौकटीत दिलेल्या विरामचिन्हांची नावे लिहा : [2]

(i) !   (ii) ?

(iii) ,   (iv) "..."

Prof. Dilip U. Pal's LAKSHYA Private Tuition Creating Joyful Education

## विभाग 5 : उपयोजित लेखन

5. (अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा : [6]

(1) पत्रलेखन :

जागृती युवा प्रबोधिनी, काष्टी आयोजित
विद्यार्थ्यांसाठी मॅरेथॉन स्पर्धा
दिनांक - 10 जानेवारी वेळ - स. 7.00
आकर्षक पारितोषिके
नावनोंदणी सुरू
वयोगट - 10 ते 15 वर्षे
संपर्क - श्री. सोहम शिरगावकर,
आयोजक, मॅरेथॉन स्पर्धा.
ई-मेल - jagyuva04@gmail.com

ईशान / इरा रेगे
विद्यार्थी प्रतिनिधी,
(आनंदक्षण विद्यालय, काष्टी)
या नात्याने

प्रस्तुत स्पर्धेकरिता शाळेतील वीस विद्यार्थ्यांच्या नावनोंदणीसाठी विनंती करणारे पत्र आयोजकांना लिहा.

← किंवा →

प्रस्तुत स्पर्धेच्या उत्तम नियोजनाबद्दल अभिनंदन करणारे पत्र आयोजकांना लिहा.

**(2) सारांशलेखन :**

विभाग 1 – गद्य (इ) (प्रश्न क्र. 1 - इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **[10]**

**(1) जाहिरातलेखन :**

शालेय साहित्याच्या दुकानाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**(2) बातमीलेखन :**

माध्यमिक विद्यालय, वाई येथे 14 नोव्हेंबर रोजी 'बालदिन' साजरा झाला, या कार्यक्रमाची बातमी तयार करा.

**(3) कथालेखन**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा.

मुद्दे : एक राजा – आळशी प्रजा – राजाची उपाययोजना – रस्त्यावर मधोमध दगड ठेवण्याची आज्ञा देणे – लोकांनी दगड पाहणे व कडेने जाणे – जबाबदार नागरिकाने दगड बाजूला करणे – धनाची पेटी सापडणे – राजाकडे नेऊन देणे – राजा आनंदी – प्रजेसमोर जबाबदार नागरिकाचा सत्कार – प्रजेस योग्य बोध होणे.

Prof. Dilip U. Pal's
LAKSHYA
Private Tuition
Creating Joyful Education

**(इ) लेखनकौशल्य (100 ते 120 शब्द) :**


**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[8]**

**(1) प्रसंगलेखन :**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त
भव्य वृक्षदिंडी व
वृक्षारोपण कार्यक्रम
ज्ञानसागर विद्यालय, सांगली
दि. 5 जून
वेळ - सकाळी - 8.00
प्रमुख पाहुणे - वृक्षमित्र श्री. अनिल रॉय
अध्यक्ष - श्रीमती रेखा घाटे

वरील समारंभास तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

**(2) आत्मकथन :**




वरील मुद्द्यांच्या आधारे 'छत्री' या घटकाचे आत्मकथन लिहा.

**(3) वैचारिक :**

'वीजबचत : काळाची गरज', या विषयावर तुमचे विचार लिहा.